# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील शिक्षण विभागास पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत**

**(१) २०३७६ (११-१०-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शैक्षणिक विभाग सोडून राज्यातील इतर विभागात पाच दिवसांचा आठवडा जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दररोजच्या कामातील शैक्षणिक तास वाढवून दर शनिवार, रविवार शाळा महाविद्यालय व विद्यापीठ या शैक्षणिक संस्थांना सुट्टी लागू करण्याबाबत माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान विद्यापीठ व शिक्षकेतर कर्मचारी यांनी लेखणी बंद आंदोलनाद्वारे शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शिक्षण विभागास पाच दिवसांचा आठवडा लागू केल्यास प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबास जास्त वेळ देता येऊन आपली शैक्षणिक आवड व छंद जोपासण्यास मदत होण्याबरोबरच त्यांचे मानसिक आरोग्य ही सुधारणार असल्याबाबतचे मत अनेक मानसोपचार तज्ञ तसेच शैक्षणिक संस्थेतील व शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शिक्षण संस्थांना पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत शासनाच्यावतीने सर्व कुलपतींनी पत्राद्वारे अभिप्राय मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना इतर विभागाप्रमाणे पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (३१-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींसोबत दि.२८.०९.२०२० रोजी मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदरहू बैठकीमध्ये अकृषि विद्यापीठे व महाविद्यालये यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात यावा असे मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले. त्यानुषंगाने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व अकृषि विद्यापीठांकडून यासंदर्भात अभिप्राय घेऊन सविस्तर प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदरहू प्रस्तावावर शासनस्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तारापूर औद्योगिक वसाहतीमधील विषारी वायु सोडणाऱ्या कारखान्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत

**(२) २७३५८ (११-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर औद्योगिक वसाहतीमधील कोलवडे गावच्या हद्दीत दि. २५.४.२०२१ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास अज्ञात कारखान्यातून धुरयुक्त विषारी वायु सोडल्याने ग्रामस्थांचे डोळे चुरचुरणे, घसा खवखवणे आणि भोवळ येऊन पडल्याच्या घटना घडल्याची माहिती पर्यावरणवादी कार्यकर्ते श्री.मनिष संखे यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विषारी वायु सोडणाऱ्या कारखान्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) तक्रारदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या अधिका-यांनी तक्रार प्राप्त झाल्याच्या रात्री सदर परिसराचे सर्वेक्षण केले. तथापि, सर्वेक्षणादरम्यान विषारी वायूगळती आढळून आली नाही.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तारापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांना हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सक्षमपणे चालविण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील बेकायदेशीर स्टोन क्रशर मशीनच्या खाण कामाची चौकशी करणेबाबत**

**(३) २८५२२ (१८-०६-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील पारवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत ओम साई क्रशर स्टोनच्या बेकायदा कामामुळे व खाणकामामुळे पर्यावरण आणि पिकांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी गावातील सरपंच व लोकप्रतिनिधी यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टोन क्रशर मशीनच्या बेकायदा कामामुळे पाण्याची पातळी कमी होऊन हादरे बसत असल्याने गावातील घरांना तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाने राज्य पर्यावरण परिणाम मूल्यांकन प्राधिकरण तसेच राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा न्यायदंडाधिकारी यांची समिती नेमून पाहणी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२),(३), (४) व (५)

स्टोन क्रशरमुळे होणा-या त्रासाबाबत तक्रारदाराने मा.राष्ट्रीय हरित लवादापुढे मूळ अर्ज दाखल केला असून याबाबत मा. लवादाने राज्य पर्यावरण परिणाम मूल्यांकन प्राधिकरण तसेच राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा न्यायदंडाधिकारी यांची समिती नेमून पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत. मा.लवादाच्या आदेशानुसार संयुक्त समिती कडून पाहणी झाली नाही.

---

**दिवा (जि.ठाणे) येथील क्षेपणभूमीवरील वायुप्रदूषणात वाढ झाल्याबाबत**

**(४) ३०५६४ (१८-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे)येथील क्षेपणभूमीवर सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण बऱ्याच वेळा १०० मायक्रॉनपेक्षा जास्त आढळून आले असून प्रदूषण निर्देशांक २०० टक्क्यांच्याही पुढे गेला असल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील इतर भागातील हवा लॉकडाऊन काळात प्रदूषणमुक्त असली तरी क्षेपणभुमीमुळे दिवा येथील प्रदुषण कमी झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे क्षेपणभूमीचे बायोरेमिडियशन व बायोकॅपिंग या शास्त्रोक्त पद्धतीने पूर्ण करून क्षेपणभूमी बंद करण्याचा प्रस्ताव मान्य झाला असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे दिवा येथील नागरीक वायूप्रदूषणामुळे अनेक गंभीर विकाराने त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विनाविलंब दिवा येथील अनधिकृत क्षेपणभूमी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) दिवा (जि. ठाणे) येथील क्षेपणभूमीवर सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण बऱ्याच वेळा १०० मायक्रॉनपेक्षा जास्त आढळून आले, हे खरे आहे. तथापि, आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार क्षेपणभूमीवरील वायू प्रदुषणामुळे आरोग्यास धोका असल्याबाबतच्या तक्रारी त्यांच्याकडे प्राप्त झाल्या नाहीत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) दिवा क्षेपणभूमीचे बायोरेमिडियशन व बायोकॅपिंग या शास्त्रोक्त पद्धतीने पूर्ण करून क्षेपणभूमी बंद करण्याचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडे अद्याप प्रलंबित आहे.
नागरी घनकचऱ्याचे विल्हेवाट योग्य रितीने लावली नसल्याने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठाणे महानगरपालिकेविरूद्ध ठाणे न्यायालयात खटला (क्रिमीनल खटला क्र. १०९५/१९) दाखल करण्यात केला असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत रक्कम वितरित न केल्याबाबत**

**(५) ३२३४८ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेत असताना महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोगशाळेतील साहित्य हाताळणी क्रिडा साहित्य आदींसाठी विशिष्ट रक्कम डिपॉझिटव्दारे घेतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील एकूण महाविद्यालयांची संख्या लक्षात घेता सदर विद्यार्थ्यांची कोट्यवधी रुपयांची रक्कम विविध महाविद्यालयात अनामत रक्कमेच्या स्वरूपात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालय प्रशासनामार्फत संबंधित रक्कम विद्यार्थ्यांना देणे अनिवार्य असूनही सदर रक्कम देण्यास महाविद्यालय दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्याचे उच्च शिक्षण संचालक यांनी राज्यातील सर्व विभागीय संचालकांना पत्र पाठवून महाविद्यालयांकडे असणारी अनामत रकमेची माहिती देण्याचे आदेश दिले असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उप कुलसचिव यांनी विद्यापीठाच्या संगीत महाविद्यालयांना प्राचार्यांना पत्र पाठवून अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून घेत असलेली अनामत रक्कम परत करण्याचे आदेश दिले होते हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०२-२०२२) :** (१), (२), (३) व ( ४) होय, हे अशंतः खरे आहे.
(५) होय.
(६) विद्यार्थ्यांना देय असलेली अमानत रक्कम (Deposit) तात्काळ विद्यार्थ्यांना परत देणेबाबत विद्यापीठांना व महाविद्यालयांना निदेश देण्यात आले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरवरील अनुदान पूर्ववत सुरू करण्याबाबत

**(६) ३२५४६ (१२-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरवरील अनुदान पूर्णपणे बंद झाले असून गॅस सिलेंडरचे दर वाढून ९०० ते १००० रुपये इतके झाले असल्याचे दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गॅस सिलेंडरवरील अनुदान पूर्ववत सुरू करून सिलेंडरचे दर नियंत्रित ठेवणे तसेच याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१४-०२-२०२२) :** (१) घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या किंमती दि.०१.०१.२०१५ पासून PAHAL (DBTL) योजना, २०१४ वर आधारित आहेत. विनाअनुदानित घरगुती गॅस सिलिंडरची किरकोळ विक्री किंमती, केंद्र शासनाच्या तेल कंपन्यांकडून आंतरराष्ट्रीय तेल बाजारातील उत्पादनाच्या किंमती आणि भारतीय रुपया व अमेरिकन डॉलरच्या विनियम दराच्या आधारावर नियमितपणे निश्चित करण्यात येतात.
(२) सद्यस्थितीत अनुदानित दराच्या घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या किंमती केंद्र शासनाच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून तेल कंपन्याना नियमितपणे कळविल्या जातात. त्यानुसार विनाअनुदानित गॅस सिलिंडरच्या किंमती व केंद्र शासनाने ठरवून दिलेली अनुदानित गॅस सिलिंडरची किंमत यातील फरकाची रक्कम तेल कंपन्यांव्दारे ग्राहकांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. सद्यस्थितीत एका ग्राहकास एका वर्षात १२ घरगुती अनुदानित गॅस सिलिंडर अनुज्ञेय आहेत.

महाराष्ट्र राज्यासाठी सन २०१८-१९ मध्ये रु.३,६२७.४६ कोटी, सन २०१९-२० मध्ये रु.२१८५.०७ कोटी तर सन २०२०-२१ मध्ये रु.३८३.८७ कोटी तसेच सन २०२१-२२ मध्ये ऑक्टोबर, २०२१ पर्यंत रु.६३.१३ कोटी इतकी रक्कम गॅस सबसिडीपोटी लाभार्थींच्या खात्यावर हस्तांतरित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांकडून शिधापत्रिका धारकांची फसवणूक केली जात असल्याबाबत

**(७) ३२५५० (१२-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील काही स्वस्त धान्य दुकानदारांकडून शिधापत्रिका धारकांची फसवणूक केली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत एका राजकीय पक्षाच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देऊन उक्त प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१४-०२-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

धुळे शहरात ऑनलाइन नाव असताना देखील रेशन दुकानदार लाभ देत नसल्याबाबत तसेच जनतेसोबत अरेरावी व धमकी देत असल्याबाबत समाजवादी पार्टी, धुळे यांचेकडून ऑगस्ट, २०२१ च्या दरम्यान जिल्हा पुरवठा अधिकारी, धुळे यांना निवेदने प्राप्त झाली होती.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केल्यानंतर निवेदनात तथ्य नसल्याचे निदर्शनास आले आहे. धुळे शहरामध्ये माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये समाज माध्यमांद्वारे प्राप्त तक्रारींची दाखल तातडीने घेऊन संबंधित स्वस्त धान्य दुकान क्र.८० यांची १००% अनामत रक्कम जप्त करून रक्कम रु. ५०००/- मात्र दंड आकारण्यात आलेला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, धुळे यांच्याकडून तहसिलदार, धुळे ग्रामीण, अप्पर तहसिलदार, धुळे शहर व त्यांच्या अधिनस्त असलेले पुरवठा निरीक्षण अधिकारी, धुळे आणि पुरवठा निरीक्षक यांच्या समन्वयाने संबंधित स्वस्त धान्य दुकानदार यांच्यावर परिणामकारकरित्या नियंत्रण ठेवण्यात येत असून धान्य वाटपात अनियमितता आढळून आल्यास तातडीने कठोर कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(८) ३२५७७ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकुण १२,८६१ सार्वजनिक ग्रंथालयामध्ये २२,६७८ कर्मचारी कार्यरत असून ग्रंथालय चळवळ वाढविण्याकरीता सदर अनुदानात ६०% पर्यंत वाढ करण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२० मध्ये घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानात वाढ करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ०८ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानवाढीसह विविध मागण्यांबाबत निवेदने प्राप्त आहेत.

(३) राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विविध मागण्यांसदर्भात मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.०२.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या तपासण्या करुन गुणवत्तेनुसार अनुदान वाढीबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे सदर बैठकीत मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील पदवी महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये तासिका तत्वावरील धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

**(९) ३२६७३ (१२-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीच्या मागण्यांसंदर्भात मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलनकर्ते पदाधिकारी यांच्या समवेत झालेल्या बैठकीत समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने पदवी महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये तासिका तत्वावर नियुक्ती करण्याबाबतचा अहवाल सादर केला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०२-२०२२) :** (१), (२) व (३) नेट-सेट पीएचडी धारक संघर्ष समितीची विविध निवेदने व इतर अनुषंगिक विषयाबाबत मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दि.२७.०६.२०२१ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णय दि.१०.०८.२०२१ नुसार राज्यातील पदवी महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये तासिका तत्वावरील धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप शासनास अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर ताजबंद (ता.अहमदपूर, जि.लातूर) बस स्थानकाची झालेली दूरवस्था**

**(१०) ३३०३५ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर ताजबंद (ता.अहमदपूर, जि. लातूर) येथील बस स्थानकातून आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातील तसेच रत्नागिरी, नागपूर, मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणच्या बसेसमधून प्रवासी वाहतूक होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरुर ताजबंद हे राष्ट्रीय महामार्गावरील चौरस्त्याचे ठिकाण असून येथे परीसरातील ६० गावांचे नागरीक दररोज ये-जा करीत असून या बस स्थानकात पिण्याचे पाणी व शौचालय नसणे तसेच परिसरात अस्वच्छता असल्यामुळे प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बस स्थानकात सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१७-०२-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) बसस्थानकात प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. बसस्थानक व बसस्थानक परिसराची स्वच्छता आगाराच्या देखरेखीखाली नियमित करुन घेण्यात येते. सदर बसस्थानकामध्ये प्रवाशांच्या सोयी करीता ५ फलाटे, आसन व्यवस्थेसह प्रतिक्षालय, पिण्याचे पाणी, उपहारगृह, प्रसाधनगृह, तिकीट आरक्षण व्यवस्था, वाहतूक नियंत्रक कक्ष, फळ दुकाने, बुक स्टॉल, स्टेशनरी, रसवंतीगृह इ. सुविधा उपलब्ध आहेत.
(४) विलंब झाला नाही.

---

## चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी विहीर व बोअरचे अधिग्रहण करण्याबाबत

**(११) ३३०७३ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील १० गांवे व वाडी-तांडयावर पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याने विहीर व बोअर अधिग्रहण करण्यासाठी झरी (बुा) येथील दोन विहिरींचा अधिग्रहणाचा प्रस्ताव दि. २५ मार्च, २०२१ रोजी पंचायत समिती कार्यालयाकडून तहसिलदार कार्यालयाकडे पाठवून दोन महिने होऊनही प्रस्ताव मंजूर करण्यात आला नसल्याचे दि. २८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकुर (जि.लातुर) तालुक्यातील १) मौजे कुडमुळी २) नागदरवाडी ३) ब्रम्हवाडी व (शंकरनगरतांडा) ४) चिद्रेवाडी (वडगाव एक्की) ५) रायवाडी येथील विहीर अधग्रिहनाचे प्रस्ताव व ६) मौजे बोरगाव (बु.) ७) अजनसोंडा (बु.) ८) धनगरवाडी ९) हटकरवाडी (नागदरवाडी) १०) रामवाडी (५ गावे व ५ वाडे/तांडे) अशा एकूण १० गावांना व वाडी/तांडयाना पिण्याच्या पाण्यासाठी टंचाई कालावधीत १० बोअर/विहिर अधिग्रहण प्रस्तावांना मान्यता दिलेली असून मौ. झरी बु. ता. चाकूर येथील दोन विहीर अधिग्रहणाबाबतचे प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावास महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सार्वजनिक पाणी पुरवठा विहीरीवरुन तात्पुरती पूरक नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रस्ताव मंजूरीस विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन सदर गावातील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-०२-२०२२) :** (१) व (२) अंशतः खरे आहे,

चाकूर तालुक्यातील पाणी टंचाईच्या अनुषंगाने तहसील कार्यलयास १० अधिग्रहणाचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावास मंजूरी दिली आहे.

तथापि मौ. झरी (बु) ता. चाकूर येथील अधिग्रहणाचे प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

(३) नाही,

टंचाई अंतर्गत महात्मा गांधी रोजगार योजने अंतर्गत सार्वजनिक पाणी पुरवठा विहीरीवरून तात्पुरती पूरक नळ योजनेचे काम पूर्ण करण्यात येऊन सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला होता. परंतु सदर योजनेची विहीर नागवणा साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रात असल्यामुळे व पावसाळयामध्ये सदर विहीर पाण्यात गेल्यामुळे व जलशुध्दीकरणाची सोय नसल्यामुळे पाणी पिण्यास अयोग्य आहे. त्यामुळे सदर विहीरीवरील पाणी पुरवठा योजना तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत साठवण तलावाच्या खालील बाजूस उद्‌भव विहीर घेवून करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनेवरुन तसेच सदर गावास जून्या कायम व राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पूरक पाणी पुरवठा योजनेवरून तसेच ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या विधंन विहीरीवरून पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) सदर गावांची कायमस्वरुपी पाणी टंचाई दूर करण्यासाठी सदर गावे जल जीवन मिशनच्या आराखडयात समाविष्ट करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य परीवहन महामंडळाच्या शिवशाही बसेसच्या अपघाताचे प्रमाण कमी करणे तसेच अपघातातील मृत व जखमींना आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(१२) ३३०८२ (१२-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल, २०२० ते मार्च, २०२१ या कालावधीत महामंडळाच्या शिवशाही बसेसचे १३१ अपघात होऊन पाच जणांचा मृत्यू व १२६ जण जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसेसपैकी मंडळाच्या मालकीच्या किती बसेस आहेत व अपघाताचे प्रमाण कमी होण्यासाठी महामंडळाकडून कोणते उपक्रम राबविण्यात येत आहेत,

(३) तसेच उपरोक्त अपघातातील मृत व जखमी व्यक्तींच्या नातेवाईकांना किती व कोणती आर्थिक मदत केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१७-०२-२०२२) :** (१) माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या कालावधीत रा. प. स्वमालकी शिवशाही बसेसचे १२३ व भाडेतत्वावरील शिवशाही बसेसचे ०८ असे एकुण १३१ अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये ०७ व्यक्तींचा मृत्यु झाला असुन ६९ व्यक्ती जखमी झाले आहेत.

(२) रा. प. महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीच्या ९०० व भाडेतत्वावरील १३४ बसेस अशा एकुण १०३४ शिवशाही बसेस चालनात होत्या.

अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रा. प. महामंडळाकडून दरवर्षी सुरक्षितता मोहिम राबवून चालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येत असते. चालकांची नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी तसेच विना अपघात सेवेबद्दल चालकांना प्रोत्साहनपर बक्षिसे, बिल्ले इ. देण्यात येत असतात. आगारांमध्ये बैठका घेऊन चालकांचे प्रबोधन करण्यात येते.

शिवशाही वाहनांचे पुरवठादार कंपन्यांसोबत नियमितपणे बैठका घेण्यात येत असून या बैठकांमध्ये प्रवाशी सुरक्षेच्या दृष्टीने योग्य चालकांची नियुक्ती करणेबाबत व चालकांना अपघात विरहीत सेवा देण्याच्या अनुषंगाने योग्य ती दक्षता घेण्याबाबत संबंधित पुरवठादारांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) शिवशाही बसेसच्या अपघातातील जखमी व्यक्तींना तात्कालीक मदत रु.२९,२००/- व नुकसान भरपाई रक्कम रु. ९६,३९७/- डिसेंबर २०२१ अखेर अदा करण्यात आली आहे.

(४) विलंब झाला नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा बायपासवर ट्रक व एसटी बसचा झालेला अपघात

**(१३) ३३१८१ (१२-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) बायपासवर दिनांक २३.८.२०२१ रोजी वा त्यासुमारास एसटी बस व ट्रक यांचा भीषण अपघात होऊन त्यात १ प्रवासी मृत व १८ प्रवासी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या अपघातात मृत व जखमी प्रवाशांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) सदर अपघातामध्ये रा.प.बसमधील ०१ महिला प्रवाशी मृत झाल्या असुन २६ प्रवाशी जखमी झाले आहेत.

(२) सदर अपघाताची चौकशी देऊळगांवराजा पोलिस स्टेशन यांचेकडुन करण्यात येत असुन प्राथमिक चौकशीत अपघातास ट्रक चालक जबाबदार असल्याचे आढळुन आले आहे. त्यांचे विरुध्द देऊळगांवराजा पोलिस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम २७९, ३०४ अ व ३३७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातातील मृत महिला व्यक्तीं यांचे वारसांस रा.प.महामंडळाकडुन रु.१०,०००/- इतकी आर्थिक तात्कालीक मदत देण्यात आली असून अपघात नुकसान भरपाई मागणीस्तव पी फॉर्म देण्यात आला आहे. तसेच अपघातातील २६ जखमी प्रवाशापैकी ०७ जखमी प्रवाशांना प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे एकुण रु.७०००/- आर्थिक तात्कालीक मदत देण्यात आली असून अपघात नुकसान भरपाई मागणीस्तव पी फॉर्म देण्यात आले आहेत. उर्वरीत १९ प्रवाशांना किरकोळ दुखापत असल्याने ते उपचार घेऊन परस्पर निघुन गेल्याने त्यांना आर्थिक तात्कालीक मदत देता आली नाही.

(३) विलंब झाला नाही.

---

### राज्यातील संचालक, उच्च शिक्षण व विभागीय सह.संचालक कार्यालयामधील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्यांबाबत

**(१४) ३३२२४ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संचालक, उच्च शिक्षण व विभागीय सह.संचालक कार्यालयामधील प्रशासकीय अधिकारी, सहा.प्रशासकीय अधिकारी, प्रबंधक, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक व इतर कार्यालयीन कर्मचारी यांच्या बदल्या संपुर्ण महाराष्ट्रातील विभागीय सह संचालकीय कार्यालये व शासकीय महाविद्यालये येथे करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदय यांचेकडे दिनांक ०५ जानेवारी, २००५ रोजी व त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची बदली वर्षानुवर्षे त्याच कार्यालयात होत असल्याने कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाजाकरीता येणाऱ्या अभ्यगतांशी असभ्यपणे वर्तणूक करणे, कामामध्ये टाळाटाळ करणे, अर्थपुर्ण व्यवहार करणे अशा प्रकारे अभ्यागतांना नाहक त्रास देण्याचे काम संबंधीत कर्मचारी करत असून या सर्व गोष्टींबर नियंत्रण ठेवण्याकरीता संबंधीत सर्वच कर्मचारांची बदली महाराष्ट्रातील सर्वच शासकीय महाविद्यालय व विभागीय सह.संचालक कार्यालयामध्ये बदली करणेबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) श्री. प्रकाश आबिटकर, मा. विधानसभा सदस्य यांचे दिनांक ०५ जानेवारी, २०२० चे लेखी निवेदन मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) उच्च शिक्षण संचालनालयातील गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी शासन असल्याने, सदर पदावरील बदलीसाठी पात्र अधिकाऱ्यांच्या बदल्या शासन स्तरावरून उच्च शिक्षण संचालनालयात तसेच विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयात करण्यात येतात.

तसेच गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण असल्याने, सदर कर्मचाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या स्तरावरून त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय /महाविद्यालय/संस्थांमध्ये करण्यात येतात.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**ओणनवसे, नवसे, भाटी, देर्दे (ता.दापोली जि.रत्नागिरी) या टंचाईग्रस्त गावांसाठी पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत**

**(१५) ३३२५५ (१२-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओणनवसे, नवसे, भाटी, देर्दे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावांत भिषण पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावांकरिता पंचनदी धरणावरुन पिण्याच्या पाण्याची योजना राबविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६/६/२०२१ रोजी व त्यानंतर अनेक वेळा मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने ओणनवसे, नवसे, भाटी व देर्दे गावांकरिता पिण्याच्या पाण्याची योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे,
(३) सदर मागणीप्रमाणे जल जीवन मिशन आराखडयामध्ये ओणनवसे, नवसे, भाटी व देर्दे ही गावे समाविष्ठ करण्यात आलेली असून सदर गावांकरीता सर्वेक्षण व अंदाजपत्रके करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांच्या रिक्त पदांबाबत

**(१६) ३३२९२ (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई विद्यापीठातील भाषा शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असताना चौदा भाषा विभागामध्ये पुरेशा प्रमाणात प्राध्यापक नसल्याने ६० टक्के पदे रिक्त असल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाली, सिंधी आणि रशियन भाषा या विभागामध्ये एकही कायमस्वरूपी प्राध्यापक नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भाषा शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असतांना चौदा भाषा विभागांतील प्राध्यापकांची रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, विद्यापिठातील जागांचा आढावा घेऊन प्राध्यापकांच्या विविध संवर्गातील भरतीचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३), (४) व (५) मुंबई विद्यापीठातील शासनमान्य मंजूर आढाव्यानुसार एकुण ३६५ शिक्षकीय पदांपैकी सद्य:स्थितीत २१९ पदे रिक्त आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन आवश्यकतेनुसार विद्यापीठाकडून विद्यापीठ निधीतून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणूका केल्या जात आहेत. मुंबई विद्यापीठातील पाली भाषा विभाग विद्यापीठ संचालित विनाअनुदानित विभाग आहे. तसेच सिंधी आणि रशियन भाषा विभागामधील शासन मान्य मंजूर आढाव्यानुसारची शिक्षकीय पदे रिक्त आहेत. शासन निर्णय दि.०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये अकृषि विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत शिक्षकीय पदे भरण्याची मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मुंबई विद्यापीठातील एकूण १३६ पदे भरण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. तथापि, कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने त्यांच्या दि.०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये राज्यातील वित्तीय स्थितीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने पदभरतीवर निर्बंध घातले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने पाली, सिंधी व रशियन भाषा विभागांमध्ये हंगामी शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर (जि.जळगांव) शहरात परिवहन महामंडळाच्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याबाबत**

**(१७) ३३३१५ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) शहरात परिवहन महामंडळाच्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे ऑक्टोबर, २०२० पासून वारंवार लेखी निवेदनाद्वारे मा. परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदर व्यापारी संकुल उभारण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) दि.२६.०२.२०२० च्या निवेदनाव्दारे मागणी प्राप्त झाली आहे.

(२) नव्याने धोरण अंतिम करण्याची प्रक्रिया चालू आहे. त्यानुसार राज्यातील सर्व विभागांकडून बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) चे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यात मुक्ताईनगर (जि.जळगांव) या बसस्थानकाचा देखील समावेश आहे.

(३) विलंब झाला नाही.

---

**मेहकर (जि. बुलढाणा) येथील बस स्थानकाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ३३३५८ (१२-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि. बुलढाणा) येथील बस स्थानकाच्या कामाला सुरुवात होऊन १० महिन्यांचा कालावधी होऊनही काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बस स्थानकांचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन प्रवाशांकरिता बसस्थानक खुले करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) रा.प.बुलढाणा विभागाकडून बसस्थानक बांधकाम परवानगीबाबत मेहकर नगरपरिषदेकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकमान्य टिळक जन्मस्थान स्मारकाचे पुनरुज्जीवन करण्याबाबत**

**(१९) ३३४११ (१२-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृती शताब्दीनिमित्त टिळक जन्मस्थान स्मारकाचे पुनरुज्जीवन तसेच टिळक मेमोरियल विभागीय ग्रंथालयाचे आधुनिकीकरण यासह अन्य उपक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी १० कोटी रुपये मंजूर केल्याचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंजूर रक्कमेपैंकी लोकमान्य टिळक जन्मस्थान स्मारक व विभागीय ग्रंथालय आधुनिकीकरणासाठी प्रत्येकी किती रकमेची तरतूद करण्यांत आली आहे व प्रत्यक्षात एकुण किती रक्कम उपलब्ध करुन देण्यांत आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) हे अशंत खरे आहे.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृती शताब्दीनिमित्त टिळक जन्मस्थान स्मारकाचे पुनरुज्जीवन हा विषय या विभागाशी संबंधित नाही. तथापि,

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृती शताब्दीनिमित्त शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी कार्यालयाच्या इमारतीच्या अंतर्गत दुरुस्ती, नुतनीकरण, सुशोभीकरण व आधुनिकीकरण करणे यासाठी सुमारे ४.२५ कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.०७.१०.२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर कार्यालयाचे डिजिटायझेशन करण्यासाठी सुमारे रु. ०.७५ कोटी निधीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(२) शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी कार्यालयाच्या इमारतीच्या अंतर्गत दुरुस्ती, नुतनीकरण, सुशोभीकरण व आधुनिकीकरण करणे तसेच या कार्यालयाचे डिजिटायझेशन करणे यासाठी अ.क्र. १ येथे नमूद केल्याप्रमाणे सुमारे रु. ५.०० कोटी निधीचा प्रस्ताव आहे.

(३) शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी कार्यालयाच्या इमारतीच्या अंतर्गत दुरुस्ती, नुतनीकरण, सुशोभीकरण व आधुनिकीकरण करणे या कामासाठी सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये रु.१.०० कोटी रकमेची पुरवणी मंजूर करण्यात आली असून शासन ज्ञापन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.१५.०२.२०२२ अन्वये सदर निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) अ.क्र. १ ते ३ येथे नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात परिवहन महामंडळातील चालक/वाहक पदासाठीची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) ३३४५२ (१२-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत दोन वर्षापासून राज्य परिवहन महामंडळातील २६०० पेक्षा अधिक चालक/वाहक पदासाठीची भरती प्रक्रिया प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चालक कम वाहक पदाच्या उमेदवारांचे प्रशिक्षण पुर्ण होऊन तसेच काहींची अंतिम चाचणी होऊनही त्यांना अद्याप सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) आहे.

(२) आहे.

(३) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे राज्यात करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे रा.प.महामंडळाची प्रवाशी वाहतूक अंशत: सुरु होती, नियते चालनात असल्याने मनुष्यबळाचा कमीत कमी वापर असल्याने नियमित कर्मचा-यांना देखील कामगिरी देणे शक्य होत नसल्यामुळे कर्मचारी अतिरिक्त होत आहेत. रा.प. महामंडळाचे उत्पन्न कमी झाले असल्यामुळे आर्थिक काटकसरीच्या अनुषंगाने मंत्री मंडळ उपसमितीने सुचविलेल्या उपाय योजनानुसार दि. २८.१०.२०२१ रोजी झालेल्या रा.प. महामंडळ संचालक मंडळाच्या बैठकीत सरळसेवा भरती सन-२०१६-१७ व सन- २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक भरती प्रक्रियेची कार्यवाही आहे, त्या टप्पावर स्थगित ठेवण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नायगाव, उमरी व धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यांतील ग्रामीण भागांत परिवहन महामंडळाच्या बस फेऱ्या सुरू करण्याबाबत**

**(२१) ३३६६४ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव, उमरी व धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यांतील ग्रामीण भागांत नवीन मार्गांवर राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या फेऱ्या सुरु करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन मार्गावर बसची संख्या कमी असल्याने मुख्यत्वे शालेय विद्यार्थ्यी, नोकरदार व सामान्य नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण भागांत नवीन मार्गांवर बसच्या फेऱ्या सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) नाही.
(३) उमरी - हंगीरगा, बोरजुनी, बिजेगांव, कोल्हा, नांदेड या मार्गावर मागणीनुसार ९ फे-या सुरु करण्यात आल्या आहेत.
(४) विलंब झाला नाही.

---

**उस्मानाबाद शहरातील बस स्थानकाच्या दुरवस्थेबाबत**

**(२२) ३३७२० (१२-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरातील बस स्थानकाची दुरवस्था झाली असून बस स्थानकामध्ये प्रवाशांसाठी पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बस स्थानकातून प्रवास करणा-या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने या बसस्थानकाच्या जागी नविन भव्य बसस्थानक उभारण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी अनेकदा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन मा.मंत्री मंडळानी उस्मानाबाद शहरात भाडे तत्वावर भव्य असे बसस्थानक बांधण्यास मंजुरी दिली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मंजुर बस स्थानकाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) उस्मानाबाद येथे बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर बसस्थानक बांधण्यासाठी मंजुरी दिली होती. भाडे तत्वावर बसस्थानक बांधण्यास मंजुरी दिली नव्हती.
(४) बांधा वापरा, व हस्तांतरीत करा या तत्तावरील बसस्थानकांचा विकास करण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, काम होऊ शकले नाही. सन २०१९ मध्ये रा.प. महामंडळाने उस्मानाबाद मध्यवर्ती बसस्थानकाचे उपकामासह पुर्नबांधणी करण्याच्या रु. १०.१५ कोटीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केली व निविदा सुध्दा मागविल्या. दरम्यान कोविड -१९ च्या साथीमुळे व टाळेबंदीमुळे रा.प. वाहतुक बंद ठेवावी लागली. त्यामुळे महामंडळाकडे निधीची कमतरता निर्माण झाल्यामुळे सदर कामाच्या मागविलेल्या निविदा तुर्तास प्रलंबित ठेवण्यात आल्या. आता नव्याने बीओटी धोरण राबविणेबाबत मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने राज्यातील सर्व विभागाकडुन बि.ओ.टी.चे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. यामध्ये उस्मानाबाद विभागाचा देखील प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येत असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) विलंब झाला नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचा निकाल घोषित करण्याबाबत**

**(२३) ३३७९९ (१२-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आय.टी.आय.) या विद्यार्थ्यांचा निकाल घोषित करण्याबाबत मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (१०-०२-२०२२) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) शिल्प कारागिर प्रशिक्षण योजने- अंतर्गतच्या अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा घेणे व परीक्षेचा निकाल अंतिम करण्याची कार्यवाही केंद्र शासनाच्या डी.जी.टी., नवी दिल्ली यांचेमार्फत करण्यात येते.

डी.जी. टी., नवी दिल्ली यांच्याव्दारे सदर परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दिनांक २८ डिसेंबर २०२० ते दिनांक १६ एप्रिल, २०२१ या कालावधीत टप्प्याटप्प्याने घेण्यात आलेल्या आहेत. व सदर परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ३० मे, २०२१ रोजी NCVT MIS PORTAL वर घोषित करण्यात आलेला आहे. परीक्षा व निकाल याबाबी केंद्र शासनाच्या डी.जी.टी.नवी दिल्ली यांचे अधिपत्याखाली येत असल्यामुळे सदर बाबत राज्यस्तरावरुन कोणतीही कार्यवाही केली जात नाही.

(३) लागू नाही.

---

**अमरावती जिल्हयातील ईटीआयएम तिकीट मशीन नादुरुस्त असल्याबाबत**

**(२४) ३४०६८ (१२-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हात ८ आगारासाठी ९९८ ईटीआयएम मशीन पुरविण्यात आल्या असून त्यापैकी ३७२ मशीन नादुरुस्त असल्याचे दि.२९.७.२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त मशिनच्या दुरुस्तीसाठी निधीच उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन व निधीची तरतूद करुन येथील ईटीआयएम मशिनची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) होय.

(२) नाही.

(३) ईटिआयएम व ओआरएस या प्रकल्पाच्या करारांतर्गत सेवापुरवठादार यांना देण्यात येणाऱ्या प्रति तिकीट दरामध्येच ईटिआयएम मशीनची दुरुस्ती व देखभालीच्या खर्चाचा समावेश असल्यामुळे ईटिआयएम मशीनच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची आवश्यकता नाही. अमरावती विभागातील नादुरुस्त ईटिआयएम मशीन तात्काळ दुरुस्त करण्याबाबत ओआरएस प्रकल्पाचे सेवापुरवठादार यांना लेखी सुचना देण्यात आल्या असून सेवापुरवठादारा कडून सदर मशीनची दुरुस्ती करुन घेण्यात आली आहे.

(४) विलंब झाला नाही.

---

## राज्यात सायबर सिक्युरिटी स्कुल विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२५) ३४२१४ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रज्ञानाचा वाढता वापर व सायबर सुरक्षेची आवश्यकता लक्षात घेता प्रगत शिक्षण उपलब्ध होण्यासाठी देशातील पहिले सायबर विद्यापीठ महाराष्ट्रात स्थापन करणार असल्याची घोषणा मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायबर विद्यापीठांची स्थापना कोणत्या जिल्हयात करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२१-०२-२०२२) :**(१) व (२) राज्यामध्ये तंत्रज्ञानाचा वाढता वापर व सायबर सुरक्षतेची आवश्यकता विचारात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे जिल्हा रायगड येथे स्कुल ऑफ सायबर सिक्युरिटी सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेच्या बैठकतील मुद्या क्र. ८.११ च्या अनुषंगाने सदर बैठकीत सायबर सिक्युरिटी स्कुल स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठांतर्गत स्कुल ऑफ सायबर सिक्युरिटी सुरू करण्याच्या दृष्टीने दिनांक २६/२/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट गठित करण्यात आला आहे. सदर कार्यगटास डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठांतर्गत स्कुल ऑफ सायबर सिक्युरिटी सुरू करण्याच्या दृष्टीने सर्व बाबींवर अभ्यास करून तसेच सर्वकष चर्चा करून अहवाल तयार

करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कार्यगटाद्वारे सविस्तर अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत सीआरटी (कालकेकर) आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वेतन व निवृत्तीवेतन मिळण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(२६) ३४३१० (१२-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत सीआरटी (कालकेकर) आस्थापनेवरील एकूण ६९ कर्मचाऱ्यांपैकी ३४ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत व ३५ कर्मचारी कार्यरत असून सदर निवृत्तीवेतन धारकांचे अनुदान शासन स्तरावरुन माहे ऑगस्ट, २०२० पासून प्राप्त झाले नसल्याने निवृत्ती वेतनधारक निवृत्ती वेतनापासून वंचित असल्याचे दि. ०४/०६/२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत सीआरटी (कालकेकर) आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या Resolution, दि. १० जुलै, १९७४, मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र दि. १ डिसेंबर, १९९५ तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. ०४ ऑगस्ट, १९९७ च्या आदेशान्वये कार्यवाही करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. ६ जानेवारी, १९९८ अन्वये ६९ कर्मचाऱ्यांना रुपांतरीत पदांवर नियमित आस्थापनेवर अनुमती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी जि.प. यांनी सदर आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वेतन व निवृत्तीवेतन मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे दि. ०४/०६/२०२१ रोजी सादर केलेला असुन लोकप्रतिनिधींनीदेखील सदरील सर्व ६९ पदांना मंजूरी व निवृत्तीवेतन मिळण्याची मागणी त्यांचे दि. २२/०६/२०२१ च्या पत्रान्वये मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना निवेदन देऊन केली असून त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे दि. १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत रुपांतरीत नियमित अस्थायी (सीआरटी) आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापर्यंत अन्य जिल्हा परिषदांप्रमाणे रत्नागिरी जिल्हा परिषदेला देखील २२१५१९१४ या लेखाशीर्षांतर्गत निधी वितरीत करण्यात आला आहे. तथापि काही जिल्हा परिषदांनी शासन

मान्यता नसलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन देखील उपरोक्त लेखाशीर्षातर्गत खर्ची घालण्यास सुरुवात केल्याचे विभागाच्या निदर्शनास आल्यानंतर, संबंधित कर्मचाऱ्यांच्या शासन मान्यतेचे शासन निर्णय/आदेश उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व संबंधित जिल्हा परिषदांना कळविण्यात आले होते. रत्नागिरी जिल्हा परिषदेने शासन मान्यतेबाबतचा शासन निर्णय/आदेश उपलब्ध न केल्यामुळे एप्रिल, २०२१ पासून उपरोक्त लेखाशीर्षातर्गत रत्नागिरी जिल्हा परिषदेला निधी वितरण बंद करण्यात आले होते व सदर खर्च जिल्हा परिषदेने स्वनिधीतून भागविण्याबाबत दिनांक २२.०६.२०२१ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेला कळविण्यात आले होते. तसेच उपरोक्त लेखाशीर्ष हे केवळ वेतनासाठी असताना रत्नागिरी जिल्हा परिषदेने या लेखाशीर्षातर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाचा खर्च देखील भागविला असल्याचे निदर्शनास आल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत झालेल्या या वित्तीय अनियमिततेची जबाबदारी निश्चित करण्याबाबत देखील जिल्हा परिषदेला कळविण्यात आले होते.

रत्नागिरी जिल्हा परिषदेला देण्यात येणारा निधी बंद केल्यामुळे वेतन/सेवानिवृत्ती वेतनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात मा. विधानसभा सदस्यांनी वेळोवेळी निवेदने सादर केली होती. तसेच दिनांक १९.०७.२०२१ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेने उपलब्ध केलेला अभिलेख विचारात घेऊन या विभागामार्फत रत्नागिरी जिल्हा परिषदेला वेतनासाठी उपरोक्त लेखाशीर्षातर्गत निधी वितरण सुरु करण्यात आले असून चालू आर्थिक वर्षात वेतनासाठी एकूण रु.१.८२ कोटी इतका निधी रत्नागिरी जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन दिला आहे. तसेच सेवानिवृत्ती वेतनाचा प्रश्न सोडविण्याची विनंती जिल्हा परिषदेने दिनांक ८.११.२०२१ च्या पत्रान्वये ग्राम विकास विभागाकडे केली होती. त्यानुषंगाने सेवानिवृत्ती वेतनाबाबत उचित कार्यवाही करण्याची विनंती ग्राम विकास विभागाला या विभागाच्या दि.२९.११.२०२१ च्या पत्रान्वये करण्यात आली होती. त्या विभागाने त्यांच्याकडील २०५३०७७२ या लेखाशीर्षातून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाचा खर्च भागविण्यास दिनांक १३.०१.२०२२ च्या पत्रान्वये सहमती दिली असून त्यानुषंगाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन अदा करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अनुदानित महाविद्यालयातील**
**सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त पदांबाबत**

**(२७) ३४६१६ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील दहा वर्षापासून विविध अनुदानित महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापकांच्या सुमारे १२ हजार जागा रिक्त असताना तासिका तत्वावर प्राध्यापकांची भरती करण्यास विलंब होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन हे रोजगार हमीवर काम करणाऱ्या मजुरांपेक्षाही कमी असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक प्राध्यापकांचे तासिका तत्वावरील धोरण बंद करुन युजीसीच्या निर्देशानुसार १०० टक्के प्राध्यापकांची भरती करण्यात यावी यात तासिका तत्वावरील अध्यापनाचे काम केलेला कार्यकाळ कायम नियुक्तीसाठी अनुभवाचा कार्यकाळ ग्राहय धरण्यात यावा अशी मागणी सीएचबी प्राध्यापकांनी केली आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे
(४) तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४/११/२०१८ च्या आदेशान्वये वाढ करण्यात आली होती. त्यामध्ये शासनाच्या दिनांक २२/११/२०२१ च्या आदेशा अन्वये पुन:श्च वाढ करण्यात आलेली आहे.

तसेच यासंदर्भात शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. १०/८/२०२१ च्या शासन निर्णयानुसार तासिका तत्वाच्या धोरणात सुधारणा करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली संबधित लोकप्रतिनिधी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीचे गठण करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आयएएस प्रशिक्षणासाठी विशिष्ट खाजगी संस्थेची शिफारस केल्याबाबत**

**(२८) ३४७१४ (१२-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व अकृषक विद्यापीठांनी दिनांक २१ जून, २०२१ रोजी मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना पाठवलेल्या पत्राचा संदर्भ देऊन संचालक, उच्च शिक्षण यांनी राज्यातील सर्व अकृषक विद्यापीठांना दिनांक ०१ जुलै, २०२१ रोजी पत्र पाठवून "शिव विद्या प्रबोधिनी पब्लिक ट्रस्ट" या खाजगी संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या "बाळासाहेब ठाकरे आयएएस ॲकॅडमी" द्वारे प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालय व विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याच्या सूचना देण्यासंबंधी निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थींचे अनेक महिन्यांचे विद्यावेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१०-०२-२०२२) :** (१) होय.

शिव विद्या प्रबोधिनी पब्लिक ट्रस्टद्वारे बाळासाहेब ठाकरे आयएएस अकॅडमी मार्फत १००० विद्यार्थ्यांना एक वर्ष कालावधीचे मोफत प्रशिक्षण देण्यात येते, ही बाब लक्षात घेऊन सर्व अकृषी विद्यापीठे यांना सदर मोफत प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा याकरीता अवाहन केले आहे.

महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड होईल या अपेक्षेने संचालनालयाद्वारे दिनांक १ जुलै, २०२१ च्या पत्रान्वये सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व सर्व अकृषी विद्यापीठे यांना सदर संस्थेद्वारे देण्यात येणाऱ्या मोफत प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) करोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, अमरावती व नाशिक येथील प्रवेशित विद्यार्थ्यांचे दिनांक १० मे, २०२१ ते १० ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत ऑनलाईन प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले आहेत. प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतन हे शासन निर्णय दि. २५/५/१९९२ मधील तरतुदीनूसार "प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी आसपासच्या गावातून विद्यार्थी प्रवेश घेतात त्यांना राहण्यासाठी व भोजनासाठी बराच खर्च सोसावा लागातो ही बाब विचारात घेऊन प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन अदा करण्यात येते. शासन निर्णय दि. ५/९/२०१८ अन्वये प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रु. ४०००/- इतके विद्यावेतन देण्यात येत आहे. "कोविड काळात वसतीगृह व ग्रंथालय बंद असल्याने विद्यार्थी स्वगृही अभ्यास / Online Classes attend करत असल्याने, विद्यावेतनातील काही बाबींचा विद्यार्थ्यांचा खर्च वाचल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना ६०%विद्यावेतन अदा करण्यास शासनस्तरावरुन मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील परिवहन महामंडळाच्या अनेक आगारातील कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ३४७६७ (१२-०१-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या परभणी, पाथरी, गंगाखेड (जि.परभणी) आणि हिंगोली जिल्हयातील कळमनुरी, वसमत या आगारातील २९ कोटी रुपयांची कामे मागील ५ महिन्यांपासून निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हयातील गंगाखेड येथे नवीन बस स्थानक उभारणीचा प्रस्ताव महामंडळाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सबंधित कार्यालयास निधी उपलब्ध करुन प्रलंबित कामे पूर्ण करणे तसेच गंगाखेड बस स्थानकांच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) होय,
(२) व (३) गंगाखेड येथे तेथील वाहतुकीस अनुरुप असे बसस्थानक बांधण्याकरीता वास्तुविशारदामार्फत आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. कोरोना साथीमुळे प्रवाशी वाहतुकीत मोठया प्रमाणात घट झाल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाचे महसुल कमी झालेला आहे. त्यामुळे परभणी, बसमत व कळमनुरी या बसस्थानकांची कामे प्रलंबित आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित सुरू ठेवण्याबाबत

**(३०) ३४८१३ (१२-०१-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत १४ वर्षापासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा बंद केली असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित सुरु ठेवण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्याकडे दिनांक ३१ जुलै, २०२० रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०२-२०२२) :** (१) राज्यात सन २००९मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत करार करुन, कंत्राटी तत्वावर जिल्हा व तालूका स्तरावर मनुष्यबळाच्या सेवा घेण्यात आल्या होत्या. सदर सेवा शासनाच्या दि. २७/७/२०२० रोजीच्या पत्रान्वये संपुष्टात आणण्यात आल्या होत्या ही बाब खरी आहे.तथापि, शासनाच्या सदर निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल झाल्या असून या याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशाव्दारे स्थगिती दिली असल्याने सद्यस्थितीत सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा आहे त्या परिस्थितीत सुरु ठेवण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा संदर्भातील प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नेकनूर (जि.बीड) बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ३४९०३ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर (जि.बीड) बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम राज्य परिवहन महामंडळ बीड विभागाचे मे. साबिर कंट्रक्शन पाटोदा, (जिल्हा बीड) यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. साबिर कंट्रक्शनने बांधकामाच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या काढल्या असून मुदत संपून देखील बांधकामाची सुरुवात केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळ, अभियांत्रिकी विभाग कार्यकारी अभियंता क्र. २ राज्य परिवहन औरंगाबाद, मुख्यालय नांदेड यांनी दिनांक २१ जून, २०१९ वा त्यादरम्याान रोजी मे. साबिर कंट्रक्शन, पाटोदा यांना बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम त्वरित सुरू करण्याबाबत पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कामाची मुदत संपून अद्याप बांधकाम सुरू न होण्याची कारणे काय आहेत तसेच नेकनूर बस स्थानकाचे प्रलंबित काम पुर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) बांधकामासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. कामाचा कार्यादेश दि.२१.०६.२०१९ रोजी देण्यात आला आहे. कामाची मुदत दि.२०.०८.२०२० पर्यंत होती. परंतु बांधकाम परवानगी दि.११.१२.२०१९ रोजी प्राप्त झाली. त्यानंतर माहे मार्च २०२० पासून देशभर लॉकडाऊन लागू झाल्यामुळे बांधकाम सुरु झाले नाही. बसस्थानकाचे बांधकाम मार्च २०२१ मध्ये सुरु झाले आहे. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर असून जोत्यापर्यंत काम पुर्ण झाले आहे.

(३) होय,

(४) बांधकाम परवाना डिसेंबर २०१९ मध्ये मिळाला व तद्नंतर माहे मार्च २०२० मध्ये लॉकडाऊन लागू झाल्यामुळे काम सुरु करता आले नाही. मार्च २०२१ मध्ये बांधकाम सुरु झाले आहे. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर असून जोत्यापर्यंत काम पूर्ण झाले आहे. काम सत्वर पूर्ण करुन घेण्यासाठी विभागाकडून पाठपुरावा सुरु आहे.

(५) विलंब झाला नाही.

## चंद्रपूर जिल्ह्यासाठी अतिरिक्त बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) ३५००५ (१२-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत राज्य महामंडळाच्या बस कमी पडत असल्यामुळे प्रवाशांना अडचणीचा सामाना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यासाठी ५० अतिरिक्त बसेस उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात मा.परिवहन मंत्री यांची भेट घेऊन लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने अतिरिक्त बसेस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत काय वा किती दिवसात अतिरिक्त बसेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) नाही.

(२) होय.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या वाहन ताफ्यामध्ये जसजश्या नवीन बसेस प्राप्त होतात त्यानुसार विभागांची आवश्यकता व गरजेनुसार बसेसचे वाटप करण्यात येते.

माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये चंद्रपूर विभागाची २०६ नियते चालनात होती. त्यासाठी २४९ वाहने उपलब्ध होती. त्यामुळे कुठल्याही प्रकारे वाहनांची कमतरता नव्हती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा (जि.बुलढाणा) येथे आगार निर्मिती तसेच बस स्थानकाचे विस्तारीकरण करण्याबाबत

**(३३) ३५२२१ (२९-११-२०२१). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा शहर व नांदुरा (जि.बुलढाणा) तालुका मुख्यालय अंतर्गत असलेल्या १०२ गावांतील बससेवा नियमित व सुरळीत होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्वतंत्र बस आगार निर्मिती तसेच मलकापूर व नांदुरा बस स्थानकाचे विस्तारीकरण करण्याबाबतची मागणी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील मलकापूर, नांदुरा, खामगाव व जळगाव जामोद या बस स्थानकावरून शेकडो विद्यार्थी व विद्यार्थिनी रोज शाळा कॉलेजेसकरिता प्रवास करत असतात परंतु या बसस्थानकांवर नियमित व सुरळीत बस सेवा नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नांदुरा (जि.बुलढाणा) येथे आगार निर्मिती करुन मलकापूर, नांदुरा, खामगाव व जळगाव जामोद या बस स्थानकावरून नियमित व सुरळीत बस सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) होय,

नांदुरा येथे आगार निर्मिती करुन नांदुरा व मलकापूर बस बस्थानकाचा विस्तार करण्याबाबतचे मा. विधानसभा सदस्य यांचे दि.२७.०८.२०२१ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

नांदुरा बसस्थानकांवरुन खामगाव, जळगाव-जामोद व मलकापूर आगाराच्या १९८ फे-यादवारे प्रवासी वाहतूक केली जाते. यामध्ये ६२ फे-या नांदुरा बसस्थानकावरुन नियमित सुटतात. तसेच रात्रवस्तीस ०६ फे-या असतात. त्यामुळे प्रवासी व विद्यार्थी सेवा सुरळीत सुरू राहते. सदर फे-यांचा लाभ शाळा कॉलेजमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी घेतात.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

रा.प.आगार निर्मितीच्या धोरणानुसार एखाद्या आगाराची नियते १०० पेक्षा अधिक नसल्यास ३० कि.मी.अंतराच्या आत नविन आगार मंजुर करता येत नाही. मलकापूर, नांदुरा, खामगांव व जळगांव जामोद या बसस्थानकावरुन नियमीत व सुरळीत बससेवा सुरू राहण्याबाबत आगार व्यवस्थापक यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) विलंब झाला नाही.

---

**मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील बसस्थानकाच्या इमारत बांधकामाबाबत**

**(३४) ३५३०३ (१२-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील बसस्थानकाच्या इमारतीच्या बांधकामाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने बसस्थानक इमारत बांधकाम प्रस्तावास मंजुरीसह निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय, असल्यास कार्यवाहीची सद्य:स्थिति काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) होय.

(२) मौजे कासोदा ता.एरंडोल येथे ग्रामपंचायत हद्दीत ४० x १० फुट आकाराचा प्रवाशी निवारा कार्यरत आहे. तेथे रा.प.महामंडळाची जागा नाही. बसस्थानकाची आवश्यकता तपासून, जागेच्या व निधीच्या उपलब्धतेनुसार बसस्थानकाचे बांधकाम करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंडवाना विद्यापीठातील कुलगुरु निवड प्रक्रियेबाबत

**(३५) ३५३३२ (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील गोंडवाना विद्यापीठातील कुलगुरूंसह कुलसचिव, विभाग प्रमुख, आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंडवाना विद्यापीठात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०२-२०२२) :** (१) व (२) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.०८.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये गोंडवाना विद्यापीठाच्या कुलगुरूंची नियुक्ती करण्यात आलेली आहे. कुलसचिव व इतर सांविधिक पदांच्या भरतीबाबत विद्यापीठ स्तरावरून कार्यवाही सुरु आहे. शासन निर्णय दि.०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये अकृषि विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत पदे भरण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे व त्यानुसार पदभरतीबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करून संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत शासनास सादर करण्याच्या सूचना सर्व अकृषि विद्यापीठांना देण्यात आल्या. त्यानुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या प्राप्त प्रस्तावास दि.१६.०३.२०२० व दि.२०.०३.२०२० च्या पत्रान्वये पदभरतीची प्रकिया राबविण्यास मंजूरी देण्यात आली. तदनुषंगाने विद्यापीठाने पदभरतीची प्रकिया सुरू केली. मात्र दरम्यान कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वित्तीय स्थितीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये पदभरतीवर निर्बंध आणले. मात्र यापूर्वीच गोंडवाना विद्यापीठाने पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करून त्यानुसार प्राप्त अर्जांची छाननी करून भरती प्रक्रियेची प्रकिया अंतिम टप्प्यावर होती. अशा परिस्थतीमध्ये वित्त विभागाची सहमती घेऊन सुरू असलेली पदभरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी असे विद्यापीठास कळविलेले आहे. त्यानुषंगाने विद्यापीठासाठी मंजूर असलेली व सद्य:स्थितीत रिक्त असलेली शिक्षकीय पदे भरण्याची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावरून सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये संशोधन केंद्र सुरू करण्याबाबत

**(३६) ३५३५० (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये शासकीय न्याय सहाय्यक वैद्यक संस्थेचा (फोरेन्सिक सायन्स) समावेश करण्यात आलेला असून या महाविद्यालयात संशोधन केंद्र सुरु करण्यात यावे, असा प्रस्ताव असूनही संशोधन केंद्र सुरु नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त् प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) शासकीय न्याय सहाय्यक वैद्यक संस्थेचा (फोरेन्सिक सायन्स) संशोधन केंद्र सुरु करण्याबाबतचा कोणताही अधिकृत प्रस्ताव महाविद्यालयाकडून विद्यापीठाला प्राप्त झालेला नाही. महाविद्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर कार्यवाही करणे शक्य होईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंधळगाव व इतर १० गावाची (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पूर्नजिवीत करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३७) ३५५३७ (१२-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आंधळगाव (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील आंधळगाव व इतर १० गावाची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सन १९९८ रोजी मंजूर होवून सन २००६ मध्ये कार्यान्वित झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना १५ वर्षे जूनी झाल्याने पंप व भिमा नदीवरुन प्लॅन्टकडे येणारी पाईप लाईन खराब झाली असल्याने सदर योजना पुर्नजिवीत करणे तसेच यात संत चोखामेळानगर व संत दामाजीनगर गावांचा समावेश करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दि. २/१०/२०२१ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०२-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

आंधळगाव, लक्ष्मीदहिवडी प्रादेशिक योजनेची दुरुस्ती अंतर्गत योजनेची अशुध्द पाणी पंपिंग मशिनरी बदलणे व अशुध्द पाणी उध्दरण नलिका बदलणे या कामाचा समावेश आहे. प्रादेशिक योजनेमधून ५५ LPCD ने पाणी देण्यासाठी लागणारी दोन्ही गावांसाठी आवश्यक जादाची उंच टाकी व वितरण व्यवस्था इत्यादी कामांचा समावेश या गावाचा २ स्वतंत्र योजनेमध्ये केलेला आहे. आंधळगाव योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित आहे.

महमदाबाद (शे), कचरेवाडी, ढवळस, धरमगाव, देगाव, मल्लेवाडी या ६ गावांचा जल जीवन मिशन रेट्रोफिटींग अंतर्गत केलेला आहे. अकोला, मारापूर, घरनिकी या ३ गावास अस्तित्वातील स्वतंत्र योजनेद्वारे पुरेसा पाणी पुरवठा होत आहे. संत दामाजीनगर, संत चोखामेळानगर या २ योजनांची कामे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेकडून प्रस्तावित आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नंदूर व इतर १० गावे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(३८) ३५५३८ (१२-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नंदूर (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील नंदूर व इतर १० गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ व भोसे व इतर ३९ गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना दिनांक २६ मे, २०२० पासून बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरठा विभागाने सदर योजनेतील ग्रामपंचायतीच्या सरपंचाचा विरोध असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाने प्रलंबित कामाची पुर्तता करुन न घेता सदर योजना हस्तांतरीत करुन घेतल्या असल्याने तसेच या योजना सक्षमरित्या सुरु होऊ न शकल्याने या योजनेअंतर्गत असलेली गावे अद्यापपर्यंत पाण्याअभावी वंचित असल्याने याप्रकरणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पाणी पुरवठा व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, सोलापूर यांना दि. २/८/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नंदूर व इतर १० गावे आणि भोसे व इतर ३९ गावांचा पाणी पुरवठा सुरळीत होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

भोसे व इतर ३९ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दिनांक १७.०६.२०२१ पासून बंद आहे.

(२) हो. हे खरे आहे.

(३) या दोन्ही योजना पाणीपट्टीची वसूली होत नसल्याने बंद आहेत. योजना सूरळीत चालण्याच्यादृष्टीने सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या स्तरावरून चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती करणेबाबत

**(३९) ३५६१७ (१२-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे १६ जिल्ह्यातील सुमारे १,१२९ पाणी पुरवठा योजनांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती योजनांची दुरुस्ती करून त्या पूर्ववत करण्यात आल्या आहेत व किती योजनांची दुरुस्ती अद्याप बाकी आहे तसेच यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नुकसानग्रस्त सर्व योजनांची दुरुस्ती होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-०२-२०२२) :** (१) अशंत: खरे आहे,

राज्यात अतिवृष्टी व पुरामुळे २४ जिल्हयातील एकुण २४४१ पाणी पुरवठा योजनांचे नुकसान झालेले आहे .

(२) सदर योजनांपैकी १७१५ योजना दुरुस्त करुन पुर्ववत करण्यात आल्या असून ७२६ योजनांच्या दुरुत्या करणे करणे बाकी आहे. सदर सर्व बाधित योजनांच्या दुरुस्तीसाठी रु. ५२.६३ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(३) बाधित योजनांची तात्पुरत्या स्वरूपाची दुरुस्ती करण्यात आलेली असून सदर योजना कायमस्वरुपी दुरुस्त करणेबाबत आवश्यक निधी नैसर्गिक आपत्तीच्या निकषाच्या धर्तीवर (राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी / राज्य आपत्ती प्रतिसाद निधी) महसूल व वन विभागामार्फत अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यानुसार विभागाने निधी मागणी केली आहे.

बाधित सर्व संबंधित ग्रामस्थांना खाजगी विहिर, तात्पुरत्या स्वरुपात नळ पाणी पुरवठा दुरुस्ती करुन, हातपंप, विद्युतपंप व सह नळ योजना इत्यादी साधनाद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) बसस्थानकात सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४०) ३५८०५ (१२-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) बसस्थानकात सीसीटीव्ही व गलिच्छ स्वच्छतागृह वगळता पिण्याचे पाणी, हिरकणी कक्ष, सुरक्षा व स्वच्छतेची व्यवस्था अशा कोणत्याच सुविधा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षांपासून सुरू असलेल्या या स्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामाच्या वेळी सदर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत काय,
(३) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रवाशांना तातडीने सर्व सुविधा उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) होय,

देवळा येथील प्रसाधनगृह व बसस्थानकाच्या इमारतीचे पाडकाम करुन तेथे नवीन बसस्थानकाचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर असून त्यामध्ये प्रवाशांकरीता सर्व मुलभूत सुविधा अंतर्भुत करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय,

(३) पुरुष व महिला प्रवाशांसाठी तात्पुरती स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. नविन बसस्थानकांचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत प्रवाशांकरीता आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्याबाबत विभागास सूचना देण्यात येत आहे.

---

**चांदवड (जि.नाशिक) येथील बसस्थानकाच्या नवीन इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ३५८०६ (१२-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) येथील बसस्थानकाच्या नवीन इमारतीचे काम गत दीड वर्षापासून सुरू असून कोरोनामुळे अद्याप पूर्ण न झाल्याने स्थानकात लांब पल्ल्याच्या बसेस येत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानक आवारात खासगी वाहनचालकांची मनमानी होत असल्याने वाहतूक नियंत्रकांना याचा त्रास सहन करावा लागत असून परिसरात मोठ्या प्रमाणात गवत, कचरा व मातीचे ढीग असल्याने अस्वच्छता निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू बसस्थानकाचे काम तातडीने पूर्ण करून ते बस स्थानक सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) नाही.

बसस्थानकाचे काम माहे सप्टेंबर २०२१ अखेर पूर्ण झाले आहे. सदर बसस्थानकातून लांब व मध्यम पल्ल्याच्या बसेसची ये-जा सुरु आहे.

(२) दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी बसस्थानकाचे काम पुर्ण झाले नंतर माहे ऑक्टोंबर महिन्यात सदर ठिकाणी असलेले गवत काढण्यात आलेले असून मातीचे ढीगारे उचलून जागा स्वच्छ करण्यात आली आहे.

(३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. बसस्थानकाचे काम पुर्ण झाले असून वापर सुरु झालेला आहे.

(४) विलंब झाला नाही.

---

**निलडोह - डिगडोह (ता. हिंगणा, जि.नागपुर) गावातील पाणीपुरवठा योजनेसाठी संपादित जमीनीचा मोबदला देण्याबाबत**

**(४२) ३५८३८ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलडोह - डिगडोह (ता.हिंगणा जि. नागपुर) या गावातील मंजुर पाणी पुरवठा योजनेचे काम मौजा रायपुर येथील स.न. ४८/२ येथे पुर्ण करुन दैनंदिन देखभाल दुरुस्ती व चालविण्यासाठी संबधीत ग्रामपंचायतीला सदर योजना सन २००३ मध्ये हस्तांतरीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात ज्या जागेवर योजनेचे काम करण्यात आले त्या जागेचे भुसंपादन करुन योग्य तो मोबदला न देताच सदर योजनेचे काम पुर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात भुसंपादन करण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक ०१.०१.२०२० रोजी प्रभारी अधिकारी (भुसंपादन) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर यांच्या कार्यालयात सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भुसंपादन प्रकरण क्रमांक ३४/अ-६५/२०१९-२० मौजा रायपुर (ता.हिंगणा जि. नागपुर) दिनांक २९.१०.२०२० रोजीच्या पत्राव्दारे उपजिल्हाधिकारी भुसंपादन (सामान्य), नागपुर यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभाग, नागपुर यांना संपादीत जमिनीचा मोबदला रक्कम त्यांचे कार्यालयात जमा करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मागील २२ वर्षापासून जमीनीचा मोबदला देण्यास विलंब करणाऱ्यांवर कारवाई करुन मोबदल्याची रक्कम उपजिल्हाधिकारी भुसंपादन (सामान्य) नागपुर यांच्या कार्यालयात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०२-२०२२) :** (१)अंशत: खरे आहे. योजना दिनांक १२.११.२००१ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) व (६) सदर प्रकरणी भूसंपादनाची रक्कम जास्त असल्याने क्षेत्रिय स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्रव्यवहार सुरू आहे.

---

**यवतमाळ (जि. यवतमाळ) परिसरातील रेशनच्या स्वस्त धान्याची काळयाबाजारात विक्री होत असल्याबाबत**

**(४३) ३५८८५ (१२-०१-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) परीसरातील गरीबांसाठी असलेल्या स्वस्त धान्य दुकानातुन दोन रूपये किलो गहू व तिन रूपये किलो तांदूळ देण्यात येत असून सदर धान्य यवतमाळ, पिंपळगाव, उमरसरा, वडगाव, नेताजीनगर येथील परवानाधारकांनी कागदोपत्री धान्य विकी केल्याच्या खोट्या नोंदी करुन धान्य काळयाबाजारामध्ये विक्री करत असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अध्यक्ष, राज्य अन्न आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ३०.५.२०२१ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने दि.२८.५.२०२१ ते २९.५.२०२१ या कालावधीत यवतमाळ परिसरातील रास्तभाव धान्य दुकानांची तपासणी केली असता (१) कॉटन मार्केट परिसर (२) नेताजी नगर (३) वडगाव जो.दु. पिंपळगाव (४) लोहारा (५) किटा (६) वडगाव (७) उमरसरा या ७ रास्तभाव धान्य दुकानांमध्ये मध्यम स्वरूपाचे दोष आढळल्यामुळे सात प्राधिकरपत्र धारकांवर १००% अनामत रक्कम जप्त करून यापुढे अनियमितता होणार नाही अशी सक्त ताकीद देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून ओ व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१४-०२-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

दि.२८.५.२०२१ ते २९.५.२०२१ या कालावधीत यवतमाळ परिसरातील रास्त भाव धान्य दुकानांची तपासणी केली असता (१) कॉटन मार्केट परिसर (२) नेताजी नगर (३) वडगाव जो.दु. पिंपळगाव (४) लोहारा (५) किटा (६) वडगाव (७) उमरसरा या ७ रास्त भाव धान्य दुकानांमध्ये मध्यम स्वरूपाचे दोष आढळल्यामुळे सात प्राधिकारपत्र धारकांवर १००% अनामत रक्कम जप्त करून यापुढे अनियमितता होणार नाही अशी सक्त ताकीद दिल्याबाबतचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी, यवतमाळ यांनी दि.२८.१०.२०२१ रोजी पारित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(४४) ३५८९९ (१२-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व कल्याण शहराला शहापूर तालुक्यातील जलाशयातून २.५ कोटी जनतेला पाणी उपलब्ध करुन देण्यात येत असले तरी शहापूर तालुक्यात दरवर्षी पाणी टंचाई निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनामार्फत सन २०२० पासून जल जीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत सन २०२४ पर्यंत सर्व घरांना नळाद्वारे पाणी पुरवठा करण्याचे उद्दीष्ट असून त्याकरीता सन २०२४ पर्यंतचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जल जीवन मिशन आराखडयाअंतर्गत शहापूर तालुक्यातील नाशिक जिल्हयातील भावली धरण उद्भव निश्चित करुन ९७ गावे व २५९ पाडयांसाठी ग्रीड योजना प्रस्तावित करण्यात आली असून सदर योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गांवांना पाणी पुरवठा करण्यासाठी प्रस्तावित ग्रीड योजना केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-०२-२०२२) :**(१) हे खरे आहे.
(२) अशंत: खरे आहे,
केंद्र शासनामार्फत सन २०२० पासून जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२४ पर्यंत ग्रामीण भागासाठी सर्व घरांना नळद्वारे पाणी पुरवठा करण्याचे उद्दीष्ट आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर योजनेची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असून ठेकेदार निश्चित झाल्यानंतर पुढील दोन वर्षात सदर योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इसासनी वागधरा, टाकळघाट व नलडोह व डिगडोह (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील नळ जोडणी झालेल्यांना पाणी मिटर उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४५) ३६१६८ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा तालुक्यातील (जि.नागपूर) इसासनी वागधरा, टाकळघाट व नलडोह व डिगडोह येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झाली असून नळ जोडणी झालेल्यांना पाणी मिटर त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी दि. २४/८/२०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, नागपूर यांना लेखी पत्राद्यारे मागणी करुनही अद्याप नळ धारकांना पाणी मिटर मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नळ जोडणी धारकांना पाणी मिटर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०२-२०२२) :** (१) हिंगणा तालुक्यातील (जि. नागपूर) इसासनी वाघधरा, टाकळघाट व निलडोह-डिगडोह येथील नळ पाणी पुरवठा योजनेची कामे पूर्ण झालेली

नसून सध्या प्रगतीपथावर आहेत. नळ जोडणीची तरतूद राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर योजनेत नसल्याने जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद, नागपूर मार्फत नळ जोडणीची कामे उपरोक्त गावांकरीता करण्यात येतील. पाणी मीटर हे नळ जोडणीशी निगडीत असल्याने त्याचे काम १५ वा वित्त आयोग वा ग्रामपंचायतीकडे इतर उपलब्ध निधीमधून समायोजनाने करण्यात यावे, असे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना दिनांक २७.०९.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ येथील नविन बसस्थानकाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ३६२९८ (१२-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील बस स्थानकाची दूरवस्था झाली असल्याने नवीन बसस्थानकाच्या पुनर्बांधणी करीता जा.क्र.-क्र.रा.प./का.अ/उपा.व.व्य.स/८०३ दिनांक ०३ डिसेंबर, २०१८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नविन बसस्थानक पुनर्बांधणी करीता तांत्रिक मान्यता जा.क्र.-क्र.रा.प/काअ/अम/तां.मा/१५/ दिनांक ०८ जानेवारी, २०१९ रोजी रु. १३,६३,६९,९१३/- रक्कमेला मान्यता देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचा कार्याध्येष जा.क्र.-क्र.रा.प./काअ/अम/१८१२/दि. ०९/०३/२०१९ रोजी यवतमाळ येथील बाजोरीया कंस्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीला देण्यात आले परंतु सदर बांधकाम पुर्ण करण्याची मुदत ११ महिने असताना निधी अभावी मागील दोन वर्षापासून काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाळ येथील नविन बसस्थानकाच्या पुनर्बांधनीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) माहे डिसेंबर २०१९ मध्ये जुन्या बसस्थानकाचे तोडकाम करुन नवीन बसस्थानक इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले. परंतु त्यानंतर मार्च २०२० पासून कोरोना महामारीमुळे व टाळेबंदीमुळे बांधकामाची गती मंदावली.

(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

सद्यस्थितीत बसस्थानकाच्या बेसमेंटचा बहुतांश स्लॅब पुर्ण झाला असून त्यावरील सुपर स्ट्रक्चरचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) ३६३१३ (१२-०१-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्राध्यापकांच्या ५५ टक्क्यांहून अधिक जागा रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठातील विविध विभागांसाठी मंजूर असलेल्या एकूण ३८६ पदांपैकी केवळ १७६ पदे भरण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाने सुमारे १०० प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने आणि विद्यापीठाच्या निधीच्या आधारे नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासन निर्णय दि.०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये अकृषि विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत शिक्षकीय पदे भरण्याची मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकूण १११ पदे भरण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. तथापि, कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने त्यांच्या दि.०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये राज्यातील वित्तीय स्थितीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने पदभरतीवर निर्बंध घातले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन आवश्यकतेनुसार विद्यापीठाकडून विद्यापीठ निधीतून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणूका एक वर्षाच्या कालावधीकरिता केलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कुरखेडा (जि.गडचिरोली) येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे नविन बस आगार सुरु करण्याबाबत

**(४८) ३६३३२ (२९-११-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील एकमेव गडचिरोली बस आगारातुन बसफेऱ्या चालविण्यात येत असल्याने कोरची, कुरखेडा, देसाईगंज, आरमोरी या तालुक्यांमध्ये अनियमित बस फेऱ्यांमुळे विद्यार्थी व सामान्य प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोंबर २०२१ चौथ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली बस आगारावरील ताण कमी करण्याण्याच्या दृष्टीने विभाग नियंत्रक, गडचिरोली यांनी कुरखेडा (जि.गडचिरोली) येथे अंदाजे सन २०११-१२ मध्ये नविन बस आगार बांधण्याचा प्रस्ताव सादर करुन जागा अधिग्रहीत करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन कुरखेडा (जि.गडचिरोली) येथे सन २०११-१२ मध्ये मंजूर बस आगार बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थीती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
गडचिरोली जिल्हयात गडचिरोली हे एकमेव आगार नाही. गडचिरोली जिल्हयात गडचिरोली, अहेरी हे आगार कार्यरत असुन त्याद्वारे आवश्यकते प्रमाणे जिल्हयात वाहतूक केली जाते.
(२) व (३) गडचिरोली जिल्हयातील मौजे. कुरखेडा येथे १.८६ हेक्टर आर जमिन दि.२१.०७.२००१ रोजी रा.प.महामंडळाने संपादीत करुन ताब्यात घेतलेली आहे. त्यानंतर तेथील वाहतूक वर्दळीनुसार ३ फलाटांचे बसस्थानक बांधण्याच्या रु.१९.३२ लाखाच्या कामास सन २००८ मध्ये प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन बसस्थानकाचे काम डिसेंबर-२०११ रोजी पूर्ण करण्यात आले. सन २०११-१२ मध्ये नवीन बस आगार बांधण्याबाबत प्रस्तावित केलेले नाही.
(४) विलंब झाला नाही.

---

**राज्यतील कोविडमुक्त ग्रामीण भागात मानव विकास मिशन अंतर्गत बस सुरु करण्याबाबत**

**(४९) ३६३४५ (२९-११-२०२१). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोविडमुक्त ग्रामीण भागात दिनांक २६ जुलै, २०२१ पासून इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्यात आले परंतु मानव विकास मिशन अंतर्गत परिवहन महामंडळाने अद्याप बस सेवा सुरु केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे विद्यार्थी/विद्यार्थीनींना शाळेत जाण्यासाठी खाजगी वाहनांचा वापर करावा लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असून मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होण्याच्यादृष्टीने मानव विकास मिशनची बस सेवा सुरु करण्यासाठी वरिष्ठ स्तरावरुन आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :**(१) मानव विकास योजना सुरू असलेल्या १९ विभागात सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात ४०४० फे-या चालु आहेत. त्याचा ४५९८२ विद्यार्थीनी लाभ घेत आहेत. परंतु २८.१०.२०२१ पासून राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे सद्यस्थितीत मानव विकास फे-या स्थगित आहेत.
(२) हे खरे नाही.
सुरु झालेल्या शाळा व महाविद्यालयांच्या मागणी प्रमाणे तालुका गटशिक्षण अधिकारी यांचे शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या विद्यार्थिनींची यादी रा. प महामंडळाकडे

सादर केल्यानंतर विद्यार्थिनींना त्वरित पासेस वितरीत करुन बस सेवा सुरु करण्यात आलेली असल्याने विद्यार्थिनींना खाजगी वाहनांचा वापर करावा लागलेला नाही. तसेच भूर्दंड सोसावा लागलेला नसून सुरक्षिततेचा प्रश्न देखील निर्माण झालेला नाही.
(३) शालेय फे-या सुरू करणे बाबत सर्व विभागीय कार्यालयांस लेखी कळविण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था मुंबई, औरंगाबाद तसेच नागपूर येथून बीएससी व एमएससी फॉरेंसिक सायन्स झालेल्या विद्यार्थ्यांना सेवेत प्राधान्य मिळणेबाबत**

**(५०) ३६५४७ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था मुंबई, औरंगाबाद तसेच नागपूर येथून बीएससी व एमएससी फॉरेंसिक सायन्स झालेल्या विद्यार्थ्यांना सेवेत प्राधान्य मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फॉरेंसिक सायन्स झालेल्या विद्यार्थ्यांनी मागण्यांचे निवेदन शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) अशी बाब निदर्शनास आली आहे.
(२) दि. ०४.१२.२०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील विविध पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करणे, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये इंटर्नशिप देणे, न्यायसहायक विज्ञान संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करणे, राज्यातील पोलीस दलामध्ये स्वतंत्र तांत्रिक संवर्ग तयार करणे इत्यादी कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.